## प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे कार्यालय
## जाहीर प्रगटन

क्रमांक :- १२००/२०१८.
दिनांक :-०१/०२/२०१८.

अहमदनगर जिल्हयात विशेष न्यायदंडाधिकारी या पदाच्या तीन जागा भरावयाच्या आहेत. त्याकरिता सरकारी नोकरीत असलेल्या किंवा निवृत्त सरकारी कर्मचा-यांची व खाली नमूद केलेल्या आवश्यक बाबींची पुर्तता करु शकणा-या अर्हताप्राप्त व्यक्तींकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर नेमणुकीची मुदत एक वर्ष राहील. हल्ली शासनाच्या सेवेत असलेल्या कर्मचा-याने त्यांच्या संबंधित कार्यालयाचा नाहरकत दाखला अर्जासोबत सादर केला पाहिजे तसेच सदर पदासाठी नेमणुक झाल्यास ते ज्या कार्यालयात कार्यरत असतील तेथील कामात ते टाळाटाळ करणार नाहीत व अशी तक्रार त्यांच्या कार्यालयाकडून येऊ देणार नाही याबाबतचे हमी पत्र सुध्दा अर्जासमवेत सादर करावे. सदर पदाच्या प्रत्येक कामाच्या दिवसाला रुपये ३००/- प्रमाणे मानधन दिले जाईल.

**अर्हता :**

अ) तो भारतीय नागरिक असला पाहिजे.

ब) १) तो मान्यताप्राप्त विदयापीठाचा कायदयाचा पदवीधर असला पाहिजे अथवा

२) मान्यताप्राप्त विदयापीठाचा पदवीधर असून त्याला कायदेविषयक कामकाजाचा किमान सात वर्षाचा अनुभव असला पाहिजे अथवा

३) तो कोणत्याही न्यायाधीशाच्या पदावर किमान तीन वर्षे काम केलेला असला पाहिजे अथवा

४) मानद दंडाधिकारी कामाचा किमान पाच वर्षांचा अनुभव असला पाहिजे

क) उपरोक्त पदाची कर्तव्ये पार पाडण्यास तो शारीरिक आणि मानसिकदृष्टया सक्षम असला पाहिजे.

ड) तो न्यायालयात व्यवसाय करीत असलेला वकील अथवा मुखत्यार नसावा.

इ) नैतिक अध:पाताच्या कोणत्याही गुन्हयाबद्दल त्यास शिक्षा झालेली नसावी.

फ) त्यास न्यायालयाचे मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असले पाहिजे.

आवश्यक ती पात्रता आणि अनुभव असलेल्या इच्छुक नागरिकांनी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या अर्जाच्या विहित नमुन्यानुसार अर्जातील संपूर्ण तपशील भरावा व त्यावर आपला अलीकडच्या काळातील पासपोर्ट साईज फोटो चिटकवुन मूळ कागदपत्रांच्या सत्यप्रतींसह सदरचा अर्ज प्रबंधक, जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांच्याकडे दिनांक ०५/०२/२०१८ ते दिनांक २०/०२/२०१८ या कालावधीत पाठवावा. मुदतीनंतर आलेल्या अर्जाची दखल घेतली जाणार नाही.

*(सदरचे जाहीर प्रगटन व अर्जाचा नमुना हा अहमदनगर जिल्हा न्यायालयाचे संकेतस्थळ http://court.mah.nic.in या ठिकाणी उपलब्ध आहे.)

सही/- xxx
प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश
अहमदनगर

# विशेष न्यायदंडाधिकारी पदासाठी अर्जाचा नमुना

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे संपूर्ण नांव (प्रथम आडनांव लिहावे) | : |
| २ | अर्जदाराचा पत्ता | : |
| ३ | अर्जदाराचा टेलीफोन नंबर | : |
| ४ | अर्जदाराचे वय व जन्मतारीख | : |
| ५ | अर्जदाराची मातृभाषा व इतर ज्ञात भाषा | : |
| ६ | अर्जदाराची पात्रता ( विदयापीठाच्या परिक्षेत प्राविण्य मिळविले असल्यास तसे तपशिलासह नमूद करावे ) | : |
| ७ | अर्जदार शासकिय सेवेत धारण करीत असलेल्या अथवा त्याने धारण केलेल्या पदाचा तपशील | : |
| ८ | न्यायिक अधिकारी पदाचा अथवा कायदेविषयक कामकाजाचा किंवा ऑनररी मॅजिस्ट्रेट म्हणून अर्जदारास असलेल्या अनुभवाचा तपशील | : |
| ९ | अर्जदार शारिरीक आणि मानसिकदृष्टया सक्षम आहे काय? | : |
| १० | अर्जदार आर्थिक ससेमि-यापासून मुक्त आहे काय ? | : |
| ११ | अर्जदाराची खात्यामार्फत विभागीय चौकशी चालू आहे काय ?किंवा झाली आहे काय ? आणि त्याला कमी किंवा जास्त शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशिल. | : |
| १२ | अर्जदाराचा दिवाणी अथवा फौजदारी केसमध्ये सहभाग असल्यास त्याचा तपशिल | : |
| १३ | यापुर्वी या पदासाठी अर्ज केला आहे काय ? असल्यास त्याचा परिणाम. | : |
| १४ | अर्जदारास चांगले ओळखणारे परंतु त्याचे नातेवाईक नसणारे आणि शक्यतो अर्जदाराची शाळा, विदयालय किंवा शासकीय खात्याशी संबंधीत नसणारे अशा दोन प्रतिष्ठीत व्यक्तींची नावे व पत्ते. | : |